द्राक्ष सल्ला

# पावसाळी वातावरणातील समस्यांवर वेळीच करा उपाययोजना

डॉ. आर. जी. सोमकुंवर

**गेल्या आठवड्यापासून द्राक्ष विभागातील वातावरणात बदल झाले आहेत. काही ठिकाणी पाऊस पडला, तर काही ठिकाणी ढगाळ वातावरण राहिल्यामुळे तापमानात घट झाली. आर्द्रता वाढली. सध्या स्थितीमध्ये वेगवेगळ्या वाढीच्या अवस्थेतील बागांमध्ये या वातावरणाचा परिणाम कसा होऊ शकतो आणि त्यावरील संभाव्य उपाययोजनांविषयी जाणून घेऊ.**

## काडीवर गाठी येणे

बऱ्याचशा बागेत काडीवर किंवा डोळ्यावर गाठ आल्याप्रमाणे दिसत असल्याच्या तक्रारी येत आहेत. बागेत सूक्ष्मघड निर्मिती व्यवस्थित होण्यासाठी अन्नद्रव्यांपैकी एकतर स्फुरद या खताचा वापर झाल्यास किंवा संजीवकांपैकी ६ बीए आणि युरासील चा वापर केला जातो. बऱ्याच वेळा शिफारस किंवा गरजेपेक्षा संजीवकांचा अधिक वापर झाल्यास अशी अडचण उद्भवू शकते. बागेत वाढलेल्या तापमानामध्ये पाणी कमी झाल्यास पुन्हा वाढ कमी होते. सायटोकायनीनयुक्त संजीवकांची फवारणी केल्यानंतर वेलीमध्ये जिबरेलिन्सचे प्रमाण एकदम कमी होऊन वाढ खुंटल्यासारखे दिसते. जेव्हा पाऊस सुरू होतो, तापमानात घट होऊन आर्द्रता वाढल्यामुळे अशा वाढ खुंटलेल्या बागेत जास्त गाठी दिसून येतात. गाठीच्या ठिकाणी काडी मोडून पाहिल्यास काडी लवकर तुटते व ती पोकळ असल्याचे दिसून येते. अशा काडीमध्ये अन्नद्रव्यांचा पुरवठा आवश्यकतेइतका होत नाही. ही परिस्थिती टाळण्याकरिता पुढील उपाययोजना महत्त्वाच्या ठरतील.

- अशा बागेत पाण्याची मात्रा थोडी वाढवावी.
- नत्रयुक्त खते देऊन काडीच्या शेंड्याकडील चार ते पाच पाने वाढवून घ्यावीत.
- काडीची परिपक्वता लांबणीवर जाईल, अशा प्रकारचे व्यवस्थापन करावे.
- सायटोकायनीनयुक्त संजीवकांचा वापर टाळावा.
- वाढत असलेल्या फुटींचा शेंडा पिंचिंग करण्याचे टाळावे. एकदा वाढ होण्यास सुरुवात झाल्यास मागील तयार होणाऱ्या गाठींचे प्रमाण कमी होईल.



काडीवर गाठी येण्याची समस्या.

## शेंडा वाढ जास्त होणे

ज्या बागेमध्ये खरड छाटणी वेळेवर झाली होती, तिथे सध्या काडीच्या परिपक्वतेचा कालावधी असेल. या बागेत जर काडीची परिपक्वता अर्ध्यापर्यंत आली असल्यास आता वाढ जास्त प्रमाणात होणार नाही. परंतु बदलत्या वातावरणाचा विचार करता या वेळी शेंडा वाढ दिसून येईल. नवीन फुटी निघालेल्या परिस्थितीत पाऊस जर काही काळ टिकून राहिला, तर करपा, डाऊनी मिल्ड्यूसारख्या रोगाचा प्रादुर्भाव होण्याची दाट शक्यता राहील. या वेळी बागेत शेंडा पिंचिंग करून घ्यावी.

काही बागेत खरड छाटणी उशिरा झाली असल्यास आता सूक्ष्म घड निर्मितीची अवस्था संपून ती वेल नुकतीच काडीच्या परिपक्वतेची अवस्था सुरू झाली असावी. या वेळी काडीच्या तळातील एक ते दोन पेरे फक्त दुधाळ रंगाचे झाले असतील. या वेळी जर पाऊस झाल्यास शेंडा वाढ जोमात होऊन काडीची परिपक्वता लांबणीवर पडण्याची शक्यता अधिक असेल.

तिसऱ्या आणि एकदम उशिरा खरड छाटणी झालेल्या बागेत आता मात्र सूक्ष्म घड निर्मितीचा शेवटचा टप्पा असावा. अशा स्थितीमध्ये पाऊस झाल्यास बागेत एकतर काडीची परिपक्वता लांबणीवर जाईल व रोगाचा प्रादुर्भाव जास्त प्रमाणात होईल, बगलफुटी वाढतील व त्याहीपेक्षा सूक्ष्मघड निर्मितीमध्ये अडचणी येण्याची शक्यता अधिक असेल.



अशा बागेमध्ये फक्त टिकली मारावी.

### उपाययोजना

- शेंडा पिंचिंग करून घ्यावी.
- हार्ड पिंचिंग करण्याचे टाळावे.
- बगलफुटी त्वरित काढाव्यात. यामुळे तारेवर काड्या मोकळ्या राहून कॅनोपीमध्ये हवा खेळती राहील. त्याचा फायदा काडी परिपक्वतेसाठी होईल.
- बागेत पोटॅशचा वापर वाढवणे गरजेचे असेल. (०-०-५० हे खत ४ ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणे तीन ते चार फवारण्या तीन दिवसाच्या अंतराने कराव्यात. किंवा ०-९-४६ हे खत ३ ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणे तीन दिवसाच्या अंतराने चार ते पाच फवारण्या कराव्यात.
- पाऊस पडलेल्या बागांमध्ये यावेळी मुळे कार्यक्षम झालेली असतील. अशा पांढऱ्या मुळांचे प्रमाण वाढलेले असेल. जमिनीतून पालाशयुक्त खतांचा वापर फायद्याचा राहील. उदा. ०-४०-३७ हे खत दीड किलो प्रति एकर प्रति दिवस जमिनीतून तीन ते चार वेळा देता येईल.
- वेळीच छाटणी झालेल्या बागेत ०-०-५० चा वापर फायद्याचा राहील. तर त्यानंतर छाटणी झालेल्या बागेत ०-९-४६ किंवा ०-४०-३७ या खतांचा वापर फायद्याचा ठरेल.
- पावसाची उघडीप झाल्यास पाणी देण्याचे टाळावे. पाणी फक्त विद्राव्य खते सोडण्यापुरतेच ठेवावे. या वेळी वातावरणात आर्द्रता वाढून व तापमान कमी झाल्यामुळे वेलीच्या शरीरशास्त्रीय हालचालींचा वेग वाढलेला असेल. अशा स्थितीमध्ये जास्त खतांचा वापर करण्याची गरज नसेल.
- सूक्ष्म घडनिर्मिती शेवटच्या टप्प्यात असलेल्या बागेत यावेळी स्फुरद व पालाशयुक्त खतांचा वापर गरजेचा समजावा. उदा. ०-५२-३४, ०-४०-३७, ०-९-४६ इ.

## नवीन फुटींवर घड येणे

बदलत्या वातावरणात फुटींची वाढ जोमात होताना दिसून येईल. या वेळी बागेत पाऊस जास्त प्रमाणात झालेला असल्यास दोन ते तीन दिवसामध्ये नवीन फुटीची वाढ जोमात होताना दिसून येईल. एखाद्या बागेत जमिनीत पाणी जास्त प्रमाणात साचलेले असल्यास दोन ओळीमध्ये उपलब्ध असलेली अकार्यक्षम मुळे या वेळी सक्षम होईल. उपलब्ध अन्नद्रव्ये उचलून वेलीला पुरवठा करेल. बागेत

वाढीकरिता पोषक वातावरण असल्यामुळे बगल फुटी जोमात निघतील. शेंड्याकडील वाढही तितक्याच जोमात दिसून येईल. आपल्याला काडीवर आवश्यक असलेल्या १६ ते १७ पानांपेक्षा अधिक पाने अनावश्यक असतात. ती पाने त्वरित काढून टाकावीत. बऱ्याच वेळा बागायतदार पाने काढण्यास उशीर करतात, त्यानंतर शेंडा पिंचिंग पाच ते सहा पाने खुडून करतात. त्यामुळे निघालेल्या प्रत्येक नवीन फुटींवर घड निघालेले दिसतील. अर्ध परिपक्व काडीचा शेंडा पिंचिंग केल्यानंतर निघालेल्या नवीन फुटीतून घड बाहेर निघतात. ही परिस्थिती बऱ्याचदा आता घड बाहेर निघाल्यास पुढील काळात काय होणार, ही शंका बागायतदारांना सतावते. मात्र तळातील तीन ते चार डोळे सोडल्यास काडीच्या पुढील प्रत्येक डोळ्यांमध्ये घड असतो. अपायकल डॉमिनन्स (शेंड्याचे प्रभुत्व) च्या माध्यमातून या फुटीवर शेंडा पिंचिंगद्वारे फुटींच्या वाढीवर आपण नियंत्रण ठेवतो. त्यानंतर फळ छाटणी करताच शेवटच्या डोळ्यावर फुटीसोबत घड बाहेर येतो. तेव्हा पुढील काळात घड येणार नाही, हा समज खोटा ठरतो.

फळ छाटणीच्या वेळी सरळ काडी असल्यास सातव्या ते आठव्या डोळ्यावर छाटणी घेतो. तर सबकेन असलेल्या बागेत सहाव्या ते सातव्या डोळ्यावर तयार केलेल्या गाठीच्या शेजारी छाटणी घेतो. म्हणजेच या दोन्ही बागेमध्ये घडाची जागा निश्चित झालेली आहे. तेव्हा नवीन फुटीवर घड येत असल्यास घाबरून जाण्याचे कारण नाही. मात्र सारखे शेंडा पिंचिंग केल्यास अन्नद्रव्यांचा ऱ्हास होण्याची शक्यता वाढते. नवीन फुटी जास्त जोमात व अधिक काळ राहिल्यास रोगांचा प्रादुर्भावही वाढण्याची शक्यता असते. अशा वेळी खालील उपाययोजना फायद्याच्या ठरतील.

- शेंडा पिंचिंग करताना फक्त टिकली मारली जाईल, इतकेच पाहावे.
- बगलफुटी जितक्या लवकर काढता येतील, तितकीच हवा जास्त खेळती राहील आणि प्रत्येक काडीवर सूर्यप्रकाश चांगल्या प्रकारे पडेल.
- पाण्यावर नियंत्रण ठेवून पालाशची फवारणी व जमिनीतून उपलब्धता केल्यास काडीची परिपक्वता लवकर येईल.
- ज्या बागेत काडीच्या तळातील तीन ते चार पेरे दुधाळ रंगाचे झाले अशा ठिकाणी बोर्डो मिश्रणाची फवारणी अर्धा टक्के या प्रमाणे सुरू करता येईल.



या वेळी पालाशचा वापर करणे गरजेचे असेल.

- डॉ. आर. जी. सोमकुंवर, ९४२२०३२९८८, (राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्र, मांजरी, जि. पुणे.)

- कीडनाशकांच्या शिफारशी लेबल क्लेमप्राप्त किंवा जॉएंट ॲग्रेस्कोप्राप्त आहेत. • फवारणीचे प्रमाण हाय व्हॉल्यूम फवारणी पंपासाठीचे आहे. • खरेदीवेळी पक्के बिल घ्यावे. • बॅन किंवा 'रेस्ट्रिक्टेड' आहे का पाहावे. • लेबल क्लेम वाचावेत. • पुरेशा ज्ञानाशिवाय रसायने एकमेकांत मिसळू नयेत. • रसायनांचा गट तपासावा. • पीएचआय, एमआरएल तपासावेत. • पेरणी वा लागवडीपूर्वी संबंधित बियाणांवर कोणती बीजप्रक्रिया केलेली आहे, हे तपासूनच पुढील बीजप्रक्रिया करावी.